




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.

दैनिक वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

** पात्रता **

१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

संपर्क-९४२२६६००७७

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.



vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार २३ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# प्रकाश आंबेडकर यांच्या वंचितचे नवे निवडणूक चिन्ह काय? निवडणूक आयोगाकडे पाठवली नावे

## नवी दिल्लीत प्रकाश आंबेडकर यांनी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांची भेट घेतली



**वादळवार्ता/दिल्ली**

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी निवडणुक आयोगाकडे नव्या चिन्हाची यादी सादर केली आहे. नवी दिल्लीत प्रकाश आंबेडकर यांनी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी ही यादी सादर केली. एक ते दोन दिवसांमध्ये वंचित बहुजन आघाडीला नवी निवडणूक चिन्ह मिळेल.नुकत्याच झालेल्या इंडिया आघाडीच्या मुंबईतील सभेमध्ये प्रकाश आंबेडकर यांनी जनसमुदायाला संबोधित केले होते. महाराष्ट्राच्या एकूण 48 जागांपैकी प्रकाश आंबेडकर यांनी किमान 6 जागांची मागणी केली होती. मात्र, जागावाटपमध्ये आंबेडकर यांच्या वंचित आघाडीला केवळ चार जागा देण्यात येतील असे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना वंचित आघाडी काँग्रेसला सात जागांवर पाठिबा देईल असे पत्र पाठविले होते. तसेच, या सात जागा कोणत्या त्या कळविण्यात याव्यात असेही त्यांनी आपल्या पत्रात म्हटले होते. त्यामुळे त्या सात जागा वगळता अन्य ठिकाणी प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी आपले उमेदवार देणार का? याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

वंचित आघाडीला आपले उमेदवार उभे करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून निवडणूक चिन्ह मिळवावे लागणार आहे. त्यासाठी प्रकाश आबेडकर यांनी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांची दिल्लीत भेट घेतली. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाकडे नवे निवडणूक चिन्ह मिळावे अशी मागणी केली. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक आयोगाला गॅस सिलेंडर, शिट्टी आणि रोडरोलर ही निवडणूक चिन्हे निवडणूक आयोगाकडे सुपूर्द केली आहे. निवडणूक आयोग या चिन्हावर एक ते दोन दिवसात निर्णय घेण्याची अपेक्षा आहे. तर, वंचित बहुजन आघाडीचा नेत्यानाही यापैकी कोणते चिन्ह मिळते याची उत्सुकता लागली आहे.

# जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाची वैष्णवी चौरे द्वितीय

**वादळवार्ता/केज**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने दिनांक २२ मार्च २०२४ रोजी जागतिक जलदिनानिमित्त वकृत्व स्पर्धा बलभीम महाविद्यालय बीड येथे घेण्यात आल्या यात साने गुरुजी निवासी विद्यालयाची अकरावीचे विद्यार्थिनी कुमारी चौरे वैष्णवी भीमराव जिल्हा पातळीवरील कनिष्ठ गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे सदर विद्यार्थिनीस रोख रक्कम ११ हजार रुपये व प्रमाणपत्र मिळाले आहे सदर विद्यार्थिनीने यश प्राप्त करून साने गुरुजी विद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे. या यशाबद्दल सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड मा. रविंद्रजी शिंदे साहेब ,गटशिक्षणाधिकारी श्री लक्ष्मण बेडसकर साहेब, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनील केंद्रे ,श्री दत्ता आबा चाटे, केंद्रप्रमुख श्री सुनील कांबळे सर संजय चौरे सर ,संस्थाध्यक्ष अडवोकेट उद्धवराव कराड साहेब, श्री राजेश कापसे सर ,श्री लक्ष्मण बारगजे सर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सदर विद्यार्थिनीस विद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर श्रीमती कविता गित्ते मॅडम(कराड ),श्रीमती दिपाली कांदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले होते.



# भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालय मुंबई येथे भाजपा जैन प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेशाची महा विजय २०२४ बैठक संपन्न झाली

**दैनिक वादळ वार्ता/मुंबई**

भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालय मुंबई येथे भाजपा जैन प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेशची "महा विजय २०२४" बैठक संपन्न झाली. बैठकीचे उद्घाटन विधानसभेचे अध्यक्ष आ. राहुलजी नार्वेकर व भाजपा मुंबई अध्यक्ष आशीषजी शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. जैन प्रकोष्ठचे प्रभारी राज पुरोहितजी, भाजपा प्रदेश महामंत्री संजयजी केनेकर, प्रदेश संघटन मंत्री रवीजी अनासपुरे भाजपा जैन प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी, जैन भाजपा नेता राकेश नहार आदींनी मार्गदर्शन केले. बैठकीस राज्यातील विविध जिल्ह्यातून प्रदेश पदाधिकारी, लोकसभा समन्वयक, विधानसभा समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. योगेश पटणी यांनी केले, प्रदेश महामंत्री विकास अच्छा यांनी प्रस्तावना केली तर आभार प्रदर्शन सीमाजी शहा यांनी केले.




# जलसंवर्धन प्रत्येक व्यक्तीची नैतिक जबाबदारी-प्राचार्य बप्पासाहेब हावळे

**वादळवार्ता/बीड**

पाणी हा प्रत्येक व्यक्तीचा श्वास आहे. शेती, उद्योग, व्यवसाय, दैनंदिन जीवनामध्ये पाणी महत्त्वाचे आहे. जलसंवर्धन करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, विविध स्तरावरून सातत्याने प्रयत्न चालू आहेत. परंतु खऱ्या अर्थाने जलसंवर्धन करण्यासाठी आपण आपल्या पासून सुरुवात करून, पाण्याचा थेंब थेंब जपून वापरला पाहिजे. जलसंवर्धन ही प्रत्येक व्यक्तीची नैतिक जबाबदारी आहे असे प्रतिपादन प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी केले. येथील वसंतराव काळे जर्नालिजम अँड कम्प्युटर सायन्स महाविद्यालय बीड राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे जागतिक जल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाला व्यासपीठावर प्रा. राजश्री महाजन, प्रा. शैलेश कुलकर्णी, प्रा. ओंकार देशमुख यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य बाप्पासाहेब हावळे म्हणाले की, ग्रामीण भागामध्ये सध्या पाणी टंचाईची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात पाण्याचा वापर जपून केला तर काही प्रमाणात का होईना आपण पाणीटंचाईवर मात करू शकतो. पुढील येणाऱ्या काळातील पाणी टंचाईची निर्माण होणारी परिस्थिती पाहता जलसंवर्धन ही काळाची गरज आहे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.राजश्री महाजन यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुहास गाढवे यांनी केले. शेवटी आभार प्रा. भूषण मठपती यांनी मानले. या कार्यक्रमाला महेश नेवडे, दीपक सचिन, प्रवीण उंदरे, इमरान दीपक, सचिन चौरे, सौ. खोसे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## लोकसभा निवडणूक

### माझं तिकीट राज्याने ठरवलं नाही, मला मोदींनी जबाबदारी दिली



"मला लोकसभा लढायची नव्हती. कारण मी राज्यात काम करु इच्छित होते. माझ्या बहिणीने लोकसभा लढली, सुंदर 10 वर्षे काम केलं. माझं तिकीट जाहीर झालं. मला तिकीट जाहीर झाल्यानंतर माझ्या मनामध्ये अनेक प्रश्नांचं काहुर उठलं की आपण काय करावं आता? माझ्यावर प्रेम करणारे लोकं नुसते बीड जिल्ह्यात नसून संपूर्ण राज्यात आहेत. आज ते टीव्हीवरुन मला बघत आहेत. या सर्व लोकांसाठी मला बुद्धीने निर्णय घ्यावा लागला", असं पंकजा मुंडे म्हणाल्या.

### कमळ चिन्हावर लढेन पण बाराम तीतूनच लढेन; विजय शिवतारे



उमेश पाटील यांची लायकी काय आहे? ते पगारी आहेत. नुसते भुंकतात. मी कुणावरही वैयक्तिक टीका करत नाही. सुप्रिया सुळेंवर टीका करत नाही, ना सुनेत्रा पवार यांच्यावर. पण जनतेसाठी मी निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. महायुतीची प्रत्येक सीट महत्त्वाची आहे आणि त्यामुळे बारामतीची सीट जाऊ नये यासाठी मी आग्रही आहे, असं शिवसेना नेते विजय शिवतारे यांनी म्हटलं आहे.

### रामदासभाई भडकले, उद्धव ठाकरे यांचा ऐकेरी उल्लेख



योगेश कदम यांना डावलून माजी पालकमंत्र्यांकडून फंड दिला जात होता. त्यामुळे उद्धव ठाकरेच खऱ्या अर्थाने गद्दार आहेत. उद्धव ठाकरे भोळे नाहीत, कपटी माणूस आहे. रात्री 2 वाजता मला फोन आला. मला अपमान सहन झाला नाही. त्यांच्या तोंडाची पोपटपंची चालते. दिवा विझताना फडफडतो तशी तुमची अवस्था झाली आहे. एकनाथ शिंदे यांच्या नादाला लागाल तर खबरदार, एकनाथ शिंदे यांच्या मागे रामदास कदम उभा आहे, असा इशाराच रामदास कदम यांनी दिला शिवसेना नेते रामदास कदम यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना रामदास कदम यांचा तोल गेला. त्यांनी उद्धव ठाकरे यांचा ऐकेरी उल्लेख करत जोरदार हल्ला चढवला.

# पोस्को कंपनीत जागतिक जल दिनाच्या पार्श्वभूमीवर डॉ. राहुल मुनगीकर यांचे पर्यावरण आणि जैवविविधता विषयावर मार्गदर्शन

**बोरघर /विश्वास गायकवाड**

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी सीएसआर फंड सामाजिक विनियोग या अनुषंगाने माणगाव पत्रकारां समवेत त्रैमासिक चर्चा सत्र तथा परिसंवाद शुक्रवार दिनांक २२ मार्च रोजी पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी च्या कॉन्फरन्स हॉल तथा परिसंवाद कक्षात संपन्न झाला. सदर परिसंवाद कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी व्यवस्थापनाच्या माध्यमातून जागतिक जल दिनाचे औचित्य साधून डॉ राहुल रमेश मुनगीकर ( पर्यावरण आणि जैवविविधता या विषयाचे गाढे अभासक आणि संशोधक ) यांचे पर्यावरण, जैवविविधता, पर्यावरण प्रदूषण, जलप्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग, जंगल तोड आणि मानव निर्मित वणवे आणि पर्यावरणाची हानी इत्यादी महत्वपूर्ण गंभीर विषयांवर मौलिक मार्गदर्शन आयोजित केले होते.

सदर चर्चा सत्र परिसंवाद कार्यक्रमात सर्व प्रथम पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी व्यवस्थापकीय मंडळाकडून विशेषतः मा. पाटील सर, मा. पुरंदरे सर आणि मा. महेंद्र थिटे सर यांनी पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी च्या माध्यमातून सीएसआर फंडाचा कंपनी व्यवस्थापनाने सामाजिक उत्तरदायित्त्व या उदात्त भावनेतून शिक्षण, आरोग्य आणि उपजीविका या मुलभूत बाबींवर सामाजिक उत्थानासाठी केलेल्या आर्थिक विनियोगाची माहिती पत्रकारांना दिली.

या नंतर पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी व्यवस्थापनाने पर्यावरण आणि जैवविविधता या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित केलेले पर्यावरण आणि जैवविविधता या विषयावर संशोधनात्मक पीएच डी करणारे संशोधक माननीय डॉ. राहुल रमेश मुनगीकर यांनी उपरोक्त विषयांवर सखोल असे मार्गदर्शन केले. त्याच बरोबर पर्यावरणाचे रक्षण व जैवविविधता संवर्धन आणि आपली प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आणि कर्तव्य या संदर्भात जाणीव जागृती केली.

या नंतर जागतिक जल दिन या दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन जागतिक जल दिना निमित्ताने माणगाव पत्रकारांनी डॉ राहुल रमेश मुनगीकर यांची बाईट तथा मुलाखत घेतली. या बाईट मुलाखती मध्ये पत्रकारांनी डॉ मुनगीकर यांना जागतिक जल दिन आणि जल प्रदूषण, मानवी दैनंदिन जीवनातील प्लास्टिक चा बेसुमार वापर मानवी जीवनाला, पर्यावरणाला, जल प्रदूषणाला हानीकारक तसेच मानवनिर्मित वणवे, ग्लोबल वॉर्मिंग तथा जागतिक तापमानवाढ, बेसुमार वृक्ष तोड, सांस्कृतिक होळी उत्सव आणि वृक्ष तोड, अवर्षण, प्रवर्षण, पूर स्थिती आणि दुष्काळ या बाबत चर्चात्मक परिसंवाद साधला.



## संपादकीय

# भारतीय स्वातंत्र्यलढ्यास तरूणांना प्रोत्साहितकर्ते!

नोव्हेंबर १९२८मध्ये भगतसिंग आणि त्यांचे सहकारी शिवराम राजगुरू यांनी २१ वर्षीय ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन सॉंडर्सला लाहोर येथे गोळ्या घालून ठार मारले. जेम्स स्कॉट यांना ठार मारण्याचा हेतू असताना चुकून सॉंडर्स बळी पडला. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट याने हिंदुस्थानातील लोकप्रिय राष्ट्रवादी नेते लाला लजपत राय यांच्यावर लाठी चार्जचा आदेश देऊन त्यांना जबर जखमी केले. त्यामुळे लाला लजपत राय दोन आठवड्यांनंतर मरण पावले. त्यांच्या मृत्यूचा बदला म्हणून भगतसिंगांनी स्कॉटला मारण्याचा बेत केला होता. त्याच्या या कटात चंद्रशेखर आझाद व शिवराम हरी राजगुरू सहभागी होते. त्यानंतर भगतसिंग व राजगुरू यांचा शोध घेत असल्याचे पाहून चंद्रशेखर आझाद यांनी चानन सिंघ नावाच्या भारतीय पोलिस अधिकाऱ्याला मारले.

भगतसिंग: हे एक भारतीय क्रांतिकारक होते. हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याविरुद्धच्या लढ्यात त्यांनी केलेल्या दोन हिंसात्मक कार्यांमुळे वयाच्या २३व्या वर्षी त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. भगतसिंगांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९०७ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतातील ल्यालंपूर जिल्ह्यातील बंगा गावात झाला. त्याच्या आईचे नाव विद्यावती व वडिलांचे किशनसिंग होते. ज्यावेळेस त्याच्या वडिलांची व दोन काकांची तुरुंगातून सुटका झाली, त्याच सुमारास भगतसिंगांचा जन्म झाला. त्यांच्या कुटुंबातील बरेच सदस्य भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले होते, तर काही महाराजा रणजितसिंगाच्या सैन्यात होते. काही कुटुंबीय सामाजिक कार्यांमध्ये सक्रिय होते. त्याचे वडील व काका हे करतारसिंग साराभाई व हर दयाल यांच्या गदर पार्टीचे सदस्य होते. दि.९ सप्टेंबर १९२५ रोजी भगतसिंगांच्या पुढाकाराने व आग्रहाने क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे नाव हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन असे ठेवण्यात आले. असोसिएशन हा भाग समाजप्रबोधन, माहितीपत्रके, साहित्य सामग्रीची जमवाजमव, भूमिगतांना आश्रय देणे यासाठी तर आर्मी हा भाग प्रत्यक्ष क्रांतिकार्यासाठी असे विभाजन केले गेले. हुतात्मा चंद्रशेखर आझाद हे मुख्य समन्वयक व सेनेचे मुख्य सेनापती तर भगतसिंग यांच्यावर संघटनेचे समन्वयक व दोहोंचे सदस्य व नियंत्रक अशी कामगिरी सोपविली गेली. या संघटनेचे स्वप्न व एकमेव ध्येय म्हणजे सशस्त्र क्रांतीद्वारे इंग्रज सरकार उलथून टाकून भारतीय संघराज्याची स्थापना केली. खून करून, दरोडे घालून वा चार इंग्रजांना ठार करून काही स्वातंत्र्य मिळणार नाही असा त्यांचा उपहास वा धिक्कार केला गेला, तरी प्रत्यक्ष त्यांचे कार्य हे साक्षात राजसत्ता उलथून टाकण्यासाठी केलेले एक योजनाबद्ध स्वातंत्र्यसमर होते. याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे अभियोगात सरकारने ठेवलेले आरोपपत्र होय.

शिवराम हरी राजगुरू: शिवराम राजगुरू हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात फाशी गेलेले क्रांतिकारक होते. ते हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी या संघटनेच्या क्रांतिकार्यात सहभागी झाले होते. डॉक्टर हर्डीकर यांच्या सेवा दलामध्ये असतानाच त्यांचा संबंध हा हिंदुस्तान रिपब्लिकन पार्टी या क्रांतिकारी संघटनेशी आला. चंद्रशेखर आझाद, भगत सिंग आणि सुखदेव अशा क्रांतिकारकांच्या सहवासात आल्याने ते सशस्त्र उठाव करण्यास प्रेरित झाले. नॅशनल बँकेची लूट, क्रांतिकारक जोगेश चंद्रा चॅटर्जी यांची सुटका यांतही त्यांचा सहभाग होता. राजगुरूंचा जन्म पुण्याजवळ खेड येथे दि.२४ ऑगस्ट १९०८ रोजी एका मराठी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांना रघुनाथ या नावानेही ओळखले जात असे. लहानपणी १४व्या वर्षी इंग्रजी विषयातील अपयशामुळे वडील भावाने आपल्या नवविवाहित वधूसमोर त्यांना इंग्रजी धडा वाचायची शिक्षा केली. हा अपमान राजगुरूंना सहन झाला नाही.

# बदलते हवामान: जीवसृष्टीचे नुकसान!

माणसाने विज्ञानाच्या जोरावर मोठ्या प्रमाणात प्रगती केली. परंतु हे करीत असताना निसर्गचक्राच्या गतीला बाधा निर्माण झाली. त्यातूनच पर्यावरणाचा समतोल ढासळत गेला. सुरुवातीला याचे प्रमाण कमी होते, परंतु आता मोठ्या प्रमाणात रासायनिक, आधुनिक अशा अनेक साहित्याच्या वापरामुळे हवामानाच्या हानीचा उच्चांक गाठला गेला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पृथ्वीवरील पर्यावरणाच्या चक्राचा समतोल बिघडलेला दिसून येतो. मानवनिर्मित आधुनिकीकरणामुळे पृथ्वीवर हवामानात मोठ्या प्रमाणात अनपेक्षित बदल घडत आहेत. हवामानातील या अनपेक्षित बदलांमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचे, मानवी साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान तर होतेच शिवाय मोठ्या प्रमाणावर जीवितहानीही होते. मानव विकासाच्या प्रयत्नाने माणूस निसर्गात खुप ढवळाढवळ करत आहे. त्याचेच हे दुष्परिणाम पुढे पुढे दिसून येत आहेत. मानवासोबतच इतर प्राणी, पक्षी यातून सुटू शकत नाहीत. कारण पृथ्वीवरील सजीवांची जैविक साखळी आहे, ती एकमेकांवर अवलंबून आहे. त्यामुळे एका घटकातील बदलाचा परिणाम इतर घटकांवर झालेला दिसून येतो. पृथ्वीवर सजीव सृष्टी व मानवी जीवनासाठी पोषक वातावरण असल्याने पृथ्वीवर मानवाचे अस्तित्व टिकून आहे. मानव ज्या ठिकाणी वास्तव्य करतो त्याच्या सभोवतालच्या हवामानाचे नाते त्याच्याशी अतिशय घनिष्ठ असते. त्यामुळेच मानवाच्या अस्तित्वाला अर्थ आहे. म्हणून हवामान हे मानवाच्या जगण्याची आवश्यकता आहे. कारण हवामानाचा मानवी जीवनावर खोलवर परिणाम होतो. मानवाचे भरण-पोषण करण्यात हवामानाचे नाना आविष्कार महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे हवामानाचे एक प्रकारे आविष्कार आहे. जागतिक हवामान दिन दरवर्षी २३ मार्च रोजी साजरा केला जातो. दि.२३ मार्च १९५०मध्ये जागतिक हवामान संस्था स्थापन झाली. म्हणून हा जागतिक हवामान दिवस म्हणून निवडण्यात आला. हवामानाबाबत संपूर्ण जगातील लोकांमध्ये जागृती निर्माण व्हावी व हवामानाचे महत्व समजावे, तसेच हवामान चांगले राहण्यासाठी कोणती दक्षता घेतली पाहिजे, कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजे याविषयी जाणीव-जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जागतिक हवामान दिवस महत्वपूर्ण आहे.

चक्रीवादळे ओडिशाच्या किनारपट्टीवर धडकतात, तेव्हा भारत अक्षरशः वादळाच्या नजरेत असतो. चक्रीवादळे भारतासाठी नवीन नाहीत, परंतु भारताने एक प्रचंड यशस्वी निर्वासन कसे काढले- इतिहासातील सर्वात मोठे- चक्रीवादळ येण्यापूर्वी 1 दशलक्षाहून अधिक लोक सुरक्षित आश्रयस्थानी स्थलांतरित झाले हे विशेष होते. प्रचंड जीवांची शोकांतिका काय असू शकते, सन १९९९च्या चक्रीवादळामुळे झालेल्या १० हजार मृत्यूंच्या तुलनेत या स्थलांतरामुळे फक्त ४० मृत्यू झाले. येथे इतके जीव वाचवण्यात कशामुळे मदत झाली? अचूक हवामान अंदाज जगभरातील हजारो जीव वाचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. हवामान, आपल्या सभोवतालच्या वातावरणाची स्थिती म्हणून परिभाषित केलेले, अतिशय गतिमान आहे. गरम किंवा थंड, ओले किंवा कोरडे, शांत किंवा वादळी, स्वच्छ किंवा ढगाळ, धुके किंवा धुकेसदृश्य प्रत्येक स्थितीचा आपल्या जीवनावर काही परिणाम होतो. बियाणे पेरण्यापूर्वी शेतकरी ढगांचा शोध घेतात, पायलट टेकऑफ किंवा उतरण्यासाठी दृश्यमानतेवर अवलंबून असतात, खलाशी वाऱ्यावर आधारित जहाजाची पाल बसवतात आणि अनेक क्रीडा स्पर्धा पावसाच्या दयेवर असतात. पावसाच्या सरी बंगळुरूमधील वाहतूक सुरळीतपणे किंवा विस्कळीत करू शकतात!

खूप काही धोक्यात असताना आपल्या अस्तित्वासाठी हवामान समजून घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच हवामानशास्त्र नावाच्या विज्ञानाच्या एका नवीन शाखेचा उदय झाला आहे. ग्रीक शब्द "मेटीओरॉस"पासून व्युत्पन्न, ज्याचा अर्थ "उंच आकाशात" असा होतो, हवामानशास्त्रात या शब्दाचा अनुवाद "हवेतील गोष्टींचा अभ्यास" असा होतो. भारतीय संदर्भात हवामान समजून घेण्यासाठी अनेक अत्यावश्यकता आहेत. भारतासारखा देश, जो प्रामुख्याने शेतीवर आधारित अर्थव्यवस्था आहे, हवामानशास्त्र अतिशय समर्पक आहे. मान्सूनचा पाऊस वर्षातील चार महिने टिकतो, त्यामुळे आपली शेती आणि पाण्याच्या गरजांवर परिणाम होतो आणि त्याचा अंदाज लावण्याची क्षमता अत्यंत गंभीर बनते, असे प्रा.जे श्रीनिवासन सेंटर फॉर ॲटमॉस्फेरिक अँड ओशनिक सायन्सेस (सीएओएस), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर येथील प्राध्यापक म्हणतात, "माझ्या मते, भारताने हवामानशास्त्रासाठी अधिक पैसा आणि संसाधने खर्च केली पाहिजेत."

मानवतेसाठी हवामानशास्त्राचे महत्त्व ओळखून, संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान संघटनेने दरवर्षी २३ मार्च हा जागतिक हवामान दिन -डब्ल्यूएमडी- म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे आणि २०१७ची थीम "अंडरस्टँडिंग क्लाउड्स" अशी घोषित केली होती. हा एक खास मार्ग आहे, पावसाच्या हार्बिंगर्सचे आभार व्यक्त करण्याचा. हवामानशास्त्राचा संस्थापक मानला जाणारा, प्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञानी अरिस्टॉटल यांचे ३५० ईसा पूर्व मधील "हवामानशास्त्र" या ग्रंथात पाऊस आणण्यासाठी जबाबदार असलेल्या जलचक्राचे वर्णन केले आहे. परंतु ढग निर्मिती आणि पाऊस आणि सूर्याभोवती पृथ्वीच्या हालचालींमुळे होणारे ऋतुचक्र याविषयीचे भारतीय ज्ञान उपनिषदांच्या काळापासूनचे आहे. वराहमिहिराचे शास्त्रीय ग्रंथ "बृहतसंहिता" सुमारे ५०० एडीमध्ये लिहिलेले, त्या काळात अस्तित्वात असलेल्या वातावरणातील प्रक्रियांच्या सखोल ज्ञानाचा स्पष्ट पुरावा देते. जगभरातील तत्सम कार्यांमुळे ऋतू, वारा, गडगडाट, विजा, बर्फ, पूर, दऱ्या, नद्या इ.यासारख्या इतर वातावरणीय घटनांबद्दलचे आकलन समृद्ध झाले आहे. १५व्या शतकात पर्जन्यमान मोजण्यासाठी कोरियाच्या प्रिन्स मुंजॉन्ग यांनी पहिल्या प्रमाणित पर्जन्यमापकाचा शोध घेऊन हवामानशास्त्रातील एक नवीन युग चिन्हांकित केले. ॲनिमोमीटर- वाऱ्याची शक्ती मोजण्यासाठी, थर्मोस्कोप- तापमान मोजण्यासाठी, पारा बॅरोमीटर- वातावरणाचा दाब मोजण्यासाठी आणि हायग्रोमीटर- आर्द्रता मोजण्यासाठी यांसारख्या उपकरणांच्या नंतरच्या शोधांमुळे आम्हाला हवामानावर परिणाम करणारे घटक मोजण्याची क्षमता मिळाली. या उपकरणांव्यतिरिक्त, बर्फाची निर्मिती, हायड्रोडायनॅमिक्स, वायूंचे गतिज सिद्धांत, थर्मोडायनामिक्सचे नियम, ढगांची ओळख आणि वर्गीकरण आणि वाऱ्याच्या गतीचे वर्गीकरण यावरील विविध वैज्ञानिक प्रबंधांमुळे वातावरणातील विविध घटनांबद्दलची आमची समज वाढली. या व्याख्यांचा मूर्त परिणाम म्हणजे पहिला आंतरराष्ट्रीय क्लाउड ॲटलस जो १९व्या शतकाच्या शेवटी छापला गेला.

सद्य परिस्थितीवर आधारित हवामानाचा अंदाज घेण्यासाठी १७व्या शतकात हवामान निरीक्षण नेटवर्क सुरू करण्यात आले होते, जेथे डेटा नियमित अंतराने गोळा केला गेला आणि मैल दूर असलेल्या प्रक्रिया केंद्रात पाठविला गेला. टेलीग्राफच्या आगमनाने विस्तृत क्षेत्रातून हवामान निरीक्षणांचे द्रुत संकलन सक्षम केले, ज्याचा उपयोग प्रदेशासाठी वातावरणाच्या स्थितीचे नकाशे तयार करण्यासाठी केला जात असे. सन १८६०मध्ये प्रथम दैनिक हवामान अंदाज वृत्तपत्रांवर आला. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात, भारतासह अनेक देशांनी राष्ट्रीय हवामान सेवांची स्थापना केली. भारत हवामान विभाग- आईएमडी, सन १८७५मध्ये स्थापित आज हवामानशास्त्र, भूकंपशास्त्र आणि इतर संबंधित क्षेत्रांशी संबंधित सर्व बाबींमध्ये प्रमुख सरकारी संस्था आहे. २०व्या शतकाच्या पहाटेने हवामानशास्त्रातील तांत्रिक प्रगतीला वेग दिला- हवामान उपग्रह, संगणक आणि जलद संप्रेषण वाहिन्यांनी हवामान समजून घेण्याचा आणि अंदाज लावण्याचा एक नवीन अध्याय उघडला. "गेल्या शतकात हवामानशास्त्राच्या क्षेत्रात तीन क्रांतिकारक बदल झाले आहेत- उपग्रह, संगणक आणि दळणवळण" अशी प्रो.श्रीनिवासन यांनी टिप्पणी केली, "त्यांनी आमच्या वातावरणाच्या आकलनात क्रांती घडवून आणली आहे."

एप्रिल १९६०मध्ये एनएएसए-नासाद्वारे टीआईआरओएस-१ या पहिल्या यशस्वी हवामान उपग्रहाच्या प्रक्षेपणाने "आकाशात डोळा" लावला. तेव्हापासून, चीन, भारत, रशिया आणि युरोपियन युनियनमधील अनेक देशांनी त्याचे अनुसरण केले आहे आणि हवामानविषयक उपग्रहांची स्वतःची मालिका प्रक्षेपित केली आहे. कॅमेरे आणि सेन्सर्सने सज्ज असलेले हे उपग्रह पृथ्वीला उत्तर-दक्षिण दिशेला- ध्रुवीय परिभ्रमण फिरवतात किंवा फिरणाऱ्या पृथ्वीच्या-भूस्थिर संदर्भात स्थिर राहतात. उपग्रह केवळ ढग आणि ढग प्रणालींपेक्षा बरेच काही पाहू शकतात- शहरातील दिवे, आग, प्रदूषणाचे परिणाम, अरोरा, वाळू आणि धुळीची वादळे, बर्फाचे आवरण, महासागरातील प्रवाह, ऊर्जा प्रवाह इ. "सॅटेलाइट इमेजेस महासागरांवर पर्जन्यवृष्टी कशी होते, वादळ कसे जन्माला येते आणि जमिनीवर कसे सरकते, हे समजते, जे आधी अशक्य होते ते समजून घेते", प्रो.श्रीनिवासन म्हणतात, "उपग्रहांद्वारे, आम्ही आता प्रत्येक चक्रीवादळ आणि प्रत्येक वादळावर लक्ष ठेवत आहोत आणि आम्हाला आश्चर्यचकित करणारे काहीही नाही." २०व्या शतकाच्या सुरुवातीपासून, गणित आणि भौतिकशास्त्रातील एक समस्या म्हणून हवामान अंदाजाकडे पाहिले जात होते ज्याने गणिते आणि भौतिकशास्त्राच्या नैसर्गिक नियमांवर आधारित उपाय मागितले होते, त्यामुळे अंकीय हवामान अंदाजांना जन्म दिला. तथापि, गणितीय मॉडेल्स सोडवण्यामध्ये गुंतलेल्या गणनांच्या पूर्ण संख्येने संगणकाच्या आगमनापर्यंत त्याची पूर्ण क्षमता मर्यादित केली. आज, बहुतेक हवामान संस्था सुपरकॉम्प्युटर वापरतात जे सेकंदाला दहा लाख कोटी गणना प्रक्रिया करू शकतात, त्यामुळे अंदाज अचूकता वाढते.

आहे. "आम्ही सांख्यिकीय अंदाजावरून संगणक आधारित अंदाजाकडे वळलो आहोत ज्यामध्ये उपग्रहांकडील डेटा आत्मसात करणारे चांगले मॉडेल समाविष्ट आहेत. आपले वातावरण अतिशय गुंतागुंतीचे असल्याने, चक्रीवादळांसारख्या मोठ्या घटनांचे भाकीत करणे, जे पूर्वी अव्यवहार्य होते

# १७ व्या दिवशी गोपीनाथ मुंडे आमच्यातून निघून गेले, त्यामुळे लोकांचा प्रचंड आक्रोश, पंकजा मुंडे

भाजप नेत्या पंकजा मुंडे आज बीड जिल्ह्यात दाखल झाल्या. पंकजा मुंडे यांचं कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केलं. पंकजा मुंडे यांच्यावर जेसीबीच्या साहाय्याने फुलांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी पंकजा मुंडे यांच्याकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आलं. मोठी मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर पंकजा मुंडे यांनी भूमिका मांडली. "आता माईकसुद्धा तुमच्या पसंतीचा घेतला तर उमेदवारदेखील तुमच्या पसंतीचा हवा की नको? मग अर्ज भरु ना? निवडून देणार ना? मला कुणाकुणाला निवडून द्यायचं आहे, हात वर करा. मी या देशातली अशी उमेदवार आहे जिच्याकडे बायोडेटा नाही. काही उमेदवार पुस्तक बनवतात. त्याला बायोडेटा म्हणतात. एक पुस्तक घेऊन लोकं येतात, ताई आमच्या कार्याचा आढावा बघा. आम्हाला उमेदवारी द्या. या देशात गोपीनाथ मुंडे यांच्या सावलीखाली वाढलेल्या या मंचावरील प्रत्येक माणसाने कधीच मुंडे साहेबांकडे काहीच मागितलं नव्हतं", असं पंकजा मुंडे म्हणाल्या "माझे वडील मला म्हणाले की, विधानसभा लढवायची आहे. मी म्हटलं, बाबा मला राजकारणाशी काही देणंघेणं नाही. मला कशाला हवी विधानसभा? तुझी उमेदवारी




जाहीर झाली. आता माझं नाक कापलं जाईल. तुला लढावच लागेल. तेव्हापासून गोपीनाथ मुंडे यांची आज्ञा मी कधीच खाली पडू दिली नाही. त्यांच्या जाण्यानंतर त्यांनी एवढ्या कष्टानंतर, त्यावेळी कुणीच आमच्या बाजूने नव्हतं. सरकार आमच्या बाजूने नव्हतं. पण तरीही गोपीनाथ मुंडे निवडून आले आणि 17 व्या दिवशी गोपीनाथ मुंडे आमच्यातून निघून गेले. त्यामुळे लोकांचा प्रचंड आक्रोश आहे", असं पंकजा मुंडे म्हणाल्या.

'त्यामुळे मी प्रीतम ताईंना उभं केलं'

"लोकांची इच्छा नव्हती की उमेदवारी दुसऱ्या कुणाला द्यावी आणि राष्ट्रवादीने तेव्हा जाहीर केलं होतं की, घरामधला उमेदवार असेल तर आम्ही उमेदवार देणार नाही. मी जर राज्यात राहीले नसते तर भरपूर गडबड झाली असती. त्यामुळे मी प्रीतम ताईंना उभं केलं. प्रीतम ताई बिचाऱ्या डॉक्टर. त्यांचा राजकारणाशी कधी संबंध नाही आला. पण त्यांनी इतकं सुंदर काम केलं.

# आदर्श शिक्षिका शर्मिला महेंद्र गावंड यांच्या नवोपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

स्टेट इनोव्हेशन रिसर्च फाउंडेशन (सर फाउंडेशन) महाराष्ट्र तर्फे आयोजित राष्ट्रीय स्तर शैक्षणिक नवोपक्रम स्पर्धा २०२३ चा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला .

या स्पर्धेमध्ये रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा नवीन शेवे, तालुका उरण जिल्हा रायगड येथील उपक्रमशील शिक्षिका शर्मिला महेंद्र गावंड यांच्या नवोपक्रमाची निवड झाली आहे. त्यांना नॅशनल इनोव्हेटिव्ह अवॉर्ड ने सन्मानित करण्यात येणार आहे.

शिक्षकांनी आपल्या अध्यापनात नाविन्यता आणून विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे काळानुसार गरजेचे आहे हेच नवोपक्रम इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरतात .या स्पर्धेसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातून नवोपक्रम सादर करण्यात आले या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावर अनेक उपक्रमशील शिक्षकांनी भाग घेतला.



यात रायगड जिल्ह्यातून प्राथमिक विभागातून शर्मिला महेंद्र गावंड यांच्या "व्हिडिओच्या माध्यमातून अध्ययन अध्यापनास प्रेरणा" या उपक्रमाची निवड करण्यात आली. त्यांना राष्ट्रीय स्तरावरील समारंभात नॅशनल इनोव्हेटिव्ह अवार्ड देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या आधी शर्मिला गावंड यांना या वर्षी शिक्षण क्षेत्रात चांगली कामगिरी केल्याबद्दल उरण द्रोणागिरी भूषण पुरस्कार, जिल्हा शिक्षक रत्न , ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधून सर फाऊंडेशन यांच्या वतीने राज्यस्तरीय नारी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

त्यांच्या या निवडीबद्दल सर फाउंडेशनचे राज्य समन्वयक सिद्धाराम मशाळे, बाळासाहेब वाघ, महिला समन्वयक श्रीमती हेमा वाघ, आयटी विभाग प्रमुख राजकिरण चव्हाण तसेच उरण तालुक्यातून सर्वच स्तरावरून त्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले जात आहे.

# नेकनुर येथे भिषण पाणी टंचाई

## ग्रामपंचायत ने तात्काळ उपाययोजना करावी-सय्यद खालेद



दैनिक वादळ वार्तानेकनुर/शेख शाकेर

नेकनुर येथे गेल्या दोन महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याची भिषण टंचाई निर्माण झाली अस्ताना ग्रामपंचायत कडून कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात येत नसल्याने नागरिकांना पाणी विकत घेण्याशिवाय पर्याय उरला नाही नेकनुर गाव मुस्लिम बहुल असल्याने पवित्र रमजान महिन्यात उपास ठेवून तिव्र उन्हात पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड आर्थिक शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. ग्राम पंचायतने तात्काळ उपाययोजना करुन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी नसता ग्रामपंचायतीच्या विरुद्ध नागरिकांनाच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा पत्रकार सय्यद खालेद यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिला आहे.

### वार्ड क्रं ३ मध्ये पिण्याच्या पाण्याचा ठणठणाट

नेकनुर येथील वार्ड क्रं ३ हे मुस्लिम बहुल भाग असुन निवडुन आलेले तीनही सदस्य मुस्लिम आहेत या वार्ड मध्ये दर्गा कॉलनी,थेटे वस्ती,बडी बावडी,अक्सा कॉलनी (मत्तेखा मळा)शहेबाज कालनी, कुरेशी मोहल्ला,या भागात गेल्या दोन महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याचा ठणठणाट असताना तसेच रमजानचा पवित्र महिना सुरू असताना येथील जनतेनी अपेक्षेने निवडुन दिलेले सदस्य यांचा कोठेच थांगपत्ता लागत नाही.

### अडचणीच्या काळात आजी माजी सदस्य मदतीला आले धावून

नेकनुर येथे जवळपास सर्वच बोअर विहीर आटले आहेत अशा वेळी नेकनुर येथे भिषण पाणी टंचाईच्या काळात अनेक वाहनधारक पिण्याच्या पाण्याची विक्री करून पैशे कमवित आहेत परंतु सामाजिक बांधिलकी म्हणून गेल्यावर्षी प्रमाणे याहीवर्षी ग्राम पंचायत सदस्य सय्यद साजेद अली ऊर्फ बाबु भाई, ईजहारोद्दीन जागीरदार माजी ग्रा पं सदस्य सय्यद खालेद पत्रकार यांच्या मार्फत टॅन्कर द्वारे स्वतः च्या खर्चाने मोफत पाणी वाटपाचे काम सुरू आहे . विशेष करून जे गोरगरीब आहेत त्यांची पाणी विकत घेण्याची ऐपत नाही अशा लोकांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.हा पाणी पुरवठा एका वार्ड पुरतं नसुन संपूर्ण गावातील सर्व समाजातील गरीब वंचित लोकांसाठी आहे.आजी माजी ग्रामपंचायत सदस्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तारातुन स्वागत होत आहे.

# विचित्र आवाज करणारे सायलेन्सर आणि काका, दादा,अण्णा,भाऊ नंबर प्लेट रोड रोलर ने नष्ट

**वादळवार्ता/बीड**

यांत्रिक पर्यावरणामुळे निर्माण झालेला मर्यादेपलीकडील असह्य ध्वनी म्हणजे ध्वनी प्रदूषण. यामुळे मनुष्य किंवा प्राणी जीवनाच्या कृती विस्कळीत होतात किंवा त्यांचा समतोल बिघडतो यामुळे मनुष्यास वेगवेगळ्या मानसीक आजारांचा सामना करावा लागतो. याबाबत वृत्त असे की बीड शहरांमध्ये विचित्र आवाज करणारे मोटरसायकलचे सायलेन्सर यामुळे शहरांमध्ये ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले होते .बीड वाहतूक शाखेने दंबग कारवाई करत बुलेट तसेच इतर गाड्यांचे विचित्र आवाज करणारे,आणि दुचाकी वर नंबर







ऐवजी काका ,भाऊ, दादा ,मामा आदि मजकूर असणाऱ्या जप्त केलेल्या नंबर प्लेट पोलीस पेट्रोल पंप परिसराच्या आवारात रोड रोलरच्या साहाय्याने नष्ट केल्या आहेत. यामुळे निश्चित स्वरूपात काही प्रमाणात मोठ्या आवाज करणाऱ्या मोटार सायकल स्वराना व दादा, मामा, भाऊ, काका अश्या असणाऱ्या नंबर प्लेट व तीव्र आवाजाचे सायलेन्सर वापरण्यावरती नक्कीच आळा बसेल .

# महाराष्ट्र गुरुकुल संघटना आयोजित बालविवेकानंद पुरस्काराने विद्यार्थी सन्मानित

**दैनिक वादळवार्ता/केज**

दै.वादळ वार्ता/बीड

महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषद आयोजित बाल विवेकानंद पुरस्कार दरवर्षी वेगवेगळ्या गुरुकुल मधील आदर्श विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यावेळी जवळपास २२ पुरस्कार देण्यात आले महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषद नेहमीच वेगवेगळ्या उपक्रम साजरे करून मुलांच्या विकासासाठी सतत प्रयत्न करत असते. त्यातील हा एक उपक्रम होता या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जेष्ठ शिक्षण मार्गदर्शक उत्तमरावजी पवार साहेब शहरातील ज्येष्ठ बालरोग तज्ञ डॉक्टर सुभाष जोशी साहेब, जाधव साहेब त्याचबरोबर सरस्वती शाळेचे मुख्याध्यापक व महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉक्टर दत्ता नलावडे उपस्थित होते आपल्या प्रास्ताविक भाषणात गुरुकुलचे संचालक विजय कुमार गिरे सर यांनी महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण परिषद दरवर्षी मुलांसाठी वर्षभर काय करते याविषयीचे प्रास्ताविक सादर केले कार्यक्रमाचे स्वागत गीत विवेक वर्धिनी गुरुकुलाचा विद्यार्थी वैभव बर्गे यांनी गायन केले यानंतर वेगवेगळ्या २२ गुरुकुला तील मुलांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले मुलांना मार्गदर्शन करताना डॉक्टर सुभाष जोशी यांनी विवेकानंदांच्या अनेक गुणांचा लेखाजोखा मुलांच्या समोर मांडला बाल विवेकानंद ते तरुण विवेकानंद अनेक गोष्टींच्या रूपाने डॉक्टर साहेबांनी मुलांना विवेकानंद समजावून सांगितले त्याचबरोबर त्यांनी वाढत्या धकधकीच्या जीवनात फास्ट फोडला मुलांनी नकार देऊन सुद्धा




अन्नखान्याकडे भर देण्याचे मार्गदर्शन केले कार्यक्रमात सीए जाधव साहेबांनी गुरुकुल संघटनेचे कौतुक करून संघटना ही वेगळी उपक्रम करत आहे त्याचे कौतुक केले व प्रत्येक गुरुकुल चे संचालक हे आपल्या स्वतःच्या मुलाप्रमाणे या मुलांची काळजी घेतात हे आम्ही जवळून पाहतो गुरुकुल परिषदेच्या सर्व कार्याला खूप खूप शुभेच्छा दिल्या आपल्या मार्गदर्शन भाषणात डॉक्टर दत्ता नलावडे यांनी हा विवेकानंद पुरस्कार का द्यायचा विवेकानंद पुरस्काराचे महत्त्व सांगताना त्यांनी सांगितले की ज्या ज्या वेळी माणसाला नैराश्या येईल त्या त्यावेळी विवेकानंदांचे पुस्तक वाचलं तर अनेक लोकांचे जीवन बदलले आहे विवेकानंद हे बालवयापासूनच वैराग्य जीवन जगत आलेले आहेत आणि ते आज जगात सर्वांना मार्गदर्शक आहेत त्यामुळे आजचा बालक उद्याचा युवक होणार आहे तो नैराश्याच्या जगात जगू नये यासाठी त्यांनी विवेकानंद वाचला पाहिजे म्हणून ज्या ज्या मुलांना हे पुरस्कार दिले गेले आहेत त्यांनी त्या पुरस्काराचा मजकूर वाचला तरी तुम्हाला विवेकानंद समजतील कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप ज्येष्ठ शिक्षण तज्ञ उत्तम राजू पवार यांनी मुलांना उत्तम मार्गदर्शन करून भविष्यात आपण एक चांगला युवक म्हणून समाजासमोर येण्याची गरज आहेगुरुकुल संघटनेचे कार्य व बीड शहरातील ग्रुपलांचे कार्य हे प्रेरणादायी असल्याचे वक्तव्य अध्यक्ष भाषणातून केले या कार्यक्रमाला महाराष्ट्र गुरुकुल संरक्षण व संशोधन परिषदेचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी संतोष देशमुख (काका), घाडगे सर, माटे सर, जाधव सर, सानप सर, साक्रुडकर सर, विजयकुमार इंगळे सर, विजयकुमार गिरे सर, पवार सर, दुबाले सर ,आबा माने, संघटनेचे सचिव रोहिटे सर, सोन्ने सर, सुरवसे सर, आई गुरुकुलचे संचालक जाधव सर इत्यादींची उपस्थिती होती.

# गंगापूर येथील चार वर्षाच्या शाळकरी विद्यार्थ्याला पळवून नेणाऱ्या महिलेला नागरिकांच्या सतर्कतेमुळे दिले पोलिसांच्या ताब्यात

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा संजय तुपे**

गंगापूर येथील खाजगी शाळेतील विद्यार्थ्याला पळवून घेऊन जाणाऱ्या महिलेला ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या हवाली केले असून शहरात पालकांमध्ये एकच खळबळ पसरली ही महिला घोळ सर असल्याचे बोलले जात आहे मिळालेल्या माहितीनुसार २२ मार्च रोजी सकाळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात असलेल्या संस्कार इंग्लिश मीडियम शाळेतील विद्यार्थी शंकर कांतीलाल बैनाडे (वय वर्ष ४) रा कोबापुर,सदरील महीला या विद्यार्थ्याला घेऊन जातांना अंजली पेट्रोल पंप जवळ नातेवाईकांनी मुलाला ओळखल्यामुळे छत्रपती संभाजी नगर रोडवरील लक्ष्मी पत्रा स्टील दुकानासमोर नागरिकांनी वेडसर बाईला पकडल्याने पुढील मोठा अनर्थ टळला नागरिकांनी या महिलेस पोलिसांच्या ताब्यात दिले सदरील महिला ही नवापूर येथील मासे पारधी समाजाची आहे सर असल्याची बोलले जात आहे, पुढील तपास पोलीस निरीक्षक सत्यजित तायतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस तपास करत आहे.



# सोलापूरच्या शेतकऱ्याचे हॅपी फॅमिली कलिंगड दुबईला साधारण कलिंगडापेक्षा मिळाला दुप्पट दर शेतकऱ्यांची होळी गोड

## बीडच्या शेतकऱ्यांनी केली कमाल सोलापूरच्या शेतीमध्ये टरबुजांची धमाल

**वादळवार्ता/बीड**

शेतीमालाचे दर कोसळत असताना नावीन्यपूर्ण प्रयोग करत , शेती व्यवसायातील आशा जिवंत ठेवण्याचे काम काही शेतकरी करत आहेत. यामध्ये दक्षिण सोलापूर हराळवाडी या गावचे युवा शेतकरी सुमंत शेळके सजित पाटील आणि बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा आहे बीड जिल्ह्यात जमिनीक्षेत्र कोरड वाहू आहे पाणी नाही त्यामुळे बीड चे रमेश मुंडे यांनी बिन बियांच्या कलिंगडाचे उत्पादन घेत , ते थेट दुबईला निर्यात केले आहे. साधारण कलिंगदापेक्षा बिनबियांच्या कलिंगडाला दुप्पट दर मिळाला आहे. त्यामुळे आता शेतकऱ्याची होळी गोड झालेली दिसत आहे. कलिंगडे खाताना बिया न गिळता खाणे म्हणजे कसरतच,पण आता यातून सुटका होणार आहे.बी नसलेली



कलिगडाचे वान बाजारात दाखल झाले आहे.या वाणाचे उत्पादन दक्षिण सोलापूर हराळवाडी येथून शेतकरी सुमंत शेळके, सजित पाटील व रमेश मुंडे यांनी जानेवारी महिन्यात या बिनबियांच्या कलिंगडाची लागवड केली. २.५ एकर क्षेत्रावर त्यांनी ही कलिगड लागवड केली.लागवड करताना प्लॅस्टिकच्या आच्छादनाचा वापर करण्यात आला.योग्य सेंद्रिय,रासायनिक खतांचा वापर लागवडी वेळी करण्यात आल्याची माहिती शेळके यांनी दिली. त्याचबरोबर कीड व रोग नियंत्रण करण्यासाठी योग्य ती औषध फवारण्यात आली. यानंतर आवघ्या साठ दिवसांनी कलिंगडाचे पीक काढणीस आले. व्यापाऱ्यांनी बांधावरच प्रती किलो २० रुपय दर देत फळ विकत घेतले. व्यापाऱ्यांनी हे कलिंगड दुबईसह इतर आखाती देशातील शहरात पाठवल्याची माहिती देण्यात आली,.सध्या प्रचलित कलिंगडाचा दर दहा ते आकरा रुपय प्रती किलो इतका आहे.मात्र शेळके यांच्या बिनबियाच्या कलिंगडाला तुलनेने दुप्पट दर मिळाला आहे,. या २.५ एकर क्षेत्रामधून किमान ५० टन कलिंगड उत्पादित होण्याचा अंदाज आहे.सुमंत शेळके यांच्या या बिनबियाच्या कलिंगड उत्पादनाच्या प्रयोगाला सिजंटा कंपनीचे अधिकारी श्री पंढरीनाथ माने साहेब यांनी मार्गदर्शन लाभले,शेतकऱ्यांनी प्रचलित वान, शेतीची पारंपरिक पद्धत सोडत नावीन्य पूर्ण प्रयोग राबवल्यास शेतितिल तोटे कमी करू शकतो, हे दिसून येत आहे. या सर्व शेतकऱ्यांच्या मेहनतीला यश आला असून, या शेतकऱ्यांची होळी मात्र आता गोड होणार आहे.

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# वादळ वार्ता

## मुंगी कितीही लहान असली तरी हत्तीचा चावा घेऊ शकते ; मी लोकसभा निवडणूक लढवणारच-वसंत मोरे

दैनिक वादळ वार्ता पुणे/ पंकज भंडारी मला पक्षात घेतले नाही तर अपक्ष म्हणून उभा राहिन असं वसंत मोरे यांनी म्हटलं आहे.लोकसभेची निवडणूक लढवण्यावर वसंत मोरे ठाम आहेत. त्यांनी पुणे लोकसभेची निवडणूक आपण लढवणारच अशी भूमिका घेतली आहे. तसंच एक महत्त्वाचं विधानही केलं आहे. ज्यामुळे वसंत मोरे पुन्हा चर्चेत आले आहेत. १२ मार्चला वसंत मोरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अखेरचा जय महाराष्ट्र केला. त्यानंतर ते शरद पवार गटात जातील असं बोललं जात होतं. मात्र ते अद्याप कुठेही गेलेले नाहीत. माझी शिवसेना (उद्धव ठाकरे), शरद पवार गट आणि काँग्रेसशी चर्चा झाली. मात्र अद्याप निर्णय बाकी आहे असं वसंत मोरेंनी म्हटलं आहे.



# गृहमंत्र्यांनी आमच्यावर खोटे गुन्हे दाखल करु नये, अन्यथा मनोज जरांगेंचा सरकारला इशारा....!

दैनिक वादळ वार्ता
वादळवार्ता/परवेज पटेल

बीड मराठा आरक्षण आंदोलना चे नेते मनोज जरांगे पाटील यांची बीडमध्ये इशारा सभा पार पडली. या सभेत त्यांनी राज्याचे गृहमंत्री हे मराठा आंदोलकांवर खोटे गुन्हे दाखल करत असल्याचा आरोप करत सरकारला इशारा दिला आहे. राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून जेसीबी मालकांवर खोटे गुन्हे दाखल करणे बंद करा. अन्यथा, महाराष्ट्रात फिरुन मराठा समाजाला जागे करेन, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. बीडमध्ये इशारा सभेदरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकारांशी देखील संवाद साधला. बीडच्या परळी येथे बधवारी मनोज जरांगे पाटील यांची सभा पार पडली. सुरुवातीला या बैठकीला परवानगी नाकारण्यात आली. मात्र, नंतर जरांगे पाटील यांना बैठक घेण्यास सशर्त परवानगी देण्यात आली. यावर बोलताना, सरकार मराठा समाजाचा द्वेष करत आहे. त्यामुळे आमच्या बैठकांना परवानगी नाकारली जाते. या सरकारमध्ये अनेक भ्रष्टाचारी लोक आहेत, त्यांना कायदा लागू नाही का? राजकीय नेत्यांच्या सभेला परवानगी मिळते, तर आम्हाला परवानगी नाकारली जाते. मग आम्ही सामाजिक बैठका घेऊ नाहीत का असा सवालही जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. राज्यातील हे सरकार जरी मराठा समाजासोबत अन्यायाने वागत असलं तरी आमचा न्यायदेवतेवर विश्वास आहे. न्यायदेवता योग्य न्याय करेल, असंही जरांगे पाटील म्हणाले. तसेच मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल करणार नाही असं मुख्यमंत्री म्हणतात. तर दुसरीकडे गृहमंत्री गुन्हे दाखल करायला लावतात. गृहमंत्र्यांनी गुन्हे दाखल करणे थांबवावे, अन्यथा शुक्रवारपासून महाराष्ट्राचा दौरा करत संपूर्ण मराठा समाज जागा करावा लागेल, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला. मराठा आरक्षण संदर्भातील सगेसोयरे





अधिसूचना जारी करणार म्हणत आचारसंहिता लागण्यापूर्वी सरकारने कॅबिनेट बैठक घेतली होती. मात्र अद्याप सगेसोयरे अधिसूचना जारी करण्यात आली नाही. आता आचारसंहितेचा कारण पुढे करून सरकारने डाव टाकला असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. तसेच २४ तारखेला मराठा समाजाची महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत आंदोलनाची पुढची दिशा ठरवत आता मराठा समाज डाव टाकणार असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी १०० एकरावर सभा नेमकी कुठे घ्यायची याची देखील घोषणा केली जाईल. तसेच १० टक्के आरक्षण आम्हाला मान्य नाही. सरकार कडून सध्या जी भरतीप्रक्रीया राबवण्यात येत आहे, याचा फायदा मराठा विद्यार्थ्यांना घेता येत नाही आहे. ज्यांना हे आरक्षण घ्यायचे असेल त्यांनी ते घ्यावं. मात्र, ओबीसीतून आरक्षण मिळण्याच्या मागणीवर आपण ठाम आसल्याचे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले

## ज्ञानराधाच्या ठेवीदारांनी बीड येथील २७ मार्चच्या मोर्चात सहभागी व्हावे-कचरू आघाव

**वादळवार्ता/शिरूर कासार**

बीड येथे येत्या २७ मार्च रोजी प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्यात यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन केले असून या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा दहिवंडी सेवा सहकारी सोसायटीचे चेरमन कचरू आघाव यांनी केले आहे. तालुका नव्हे नव्हे तर जिल्हाभरात ज्ञानराधा मल्टीस्टेटचे लाखो खातेदार असून प्रत्येकाचे करोडो रुपये ठेवीच्या स्वरूपात असून मागणी करूनही पैसे मिळत नाहीत लोकांनी आपली पुंजी या मल्टीस्टेटमध्ये सुरक्षित म्हणून ठेवली होती मात्र संचालक गेल्या तीन चार महिन्यापासून नुसत्या भूल थापा देत असून गोरं गरिबांच्या कित्येक लेकींचे लग्न थांबले, कुणी फक्त पैसे न दिल्याने दवाखान्यात तडफडून मेले असतांना देखील संचालकांना याचे सोयीरसुताक नसल्याचे जाणवत असून ठेवीदारांना फक्त बँक प्रशासनाकडून आश्वासनसोडून काहीच भेटत नाही.आमच्या ठेवी आम्हाला तात्काळ द्याव्यात यासाठी बीड येथे ठेवीदरांचा येत्या २७ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा निघणार असून या मोर्चात तालुक्यातील ठेवीदारांनी सहभागी सहभागी व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते कचरू (बापू) आघाव यांनी केले आहे.



## मंजूर असणाऱ्या रमाई आवास घरकुल योजनेचे थकीत अनुदान वाटप करा सामाजिक कार्यकर्त्यांचे नगरपरिषद कार्यालयात निवेदन

### २०१५-१६ ते २०२२-२३ पर्यंत अनुदान थकीत

**वादळवार्ता/बीड**

बीड नगरपरिषद अंतर्गत असणाऱ्या रमाई आवास घरकुल योजनेचे थकीत असलेले अनुदान वाटप करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपरिषद कार्यालयामध्ये निवेदन दिले आहे. सन २०१५-१६,२०१६-१७, २०१७-१८,२०१८-१९, २०१९-२०,२०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षामध्ये लाभार्थ्यांना बीड नगरपरिषद अंतर्गत रमाई घरकुल आवास योजनेचे मंजूर झालेले आहेत परंतु या लाभार्थ्यांना आजपर्यंत घरकुलाचे काहींना पहिला हप्ता व काहींना दुसरा हप्ता मिळालेला असून तिसरा हप्ता देणे बाकी आहे. वेळोवेळी निवेदन देऊनही नगरपरिषदे कडून चांगल्या प्रकारे करण्यात आली आहे. यामध्ये आचारसंहितेचा काही संबंध नसताना चारव्या कडून दुसरा व तिसरा हप्ता देण्याचा आचारसंहितेचे कारण सांगण्यात येत आहे. तरी निवेदनाची दखल घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून मुख्याधिकारी नीता अंधारे यांना करण्यात आली आहे. यावेळी प्रमोद शिंदे ,अमोल पौळ (माजी नगरसेवक) कपिल सोनवणे, अमोल अहिरे, लक्ष्मण गलांडे यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



## मतदानामुळेच लोकशाही होणार सशक्त : जिल्हाधिकारी

**वादळवार्ता/बीड**

मतदानामुळेच लोकशाही सशक्त होणार. बीड जिल्ह्यात १३ मे रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांनी मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले. बीड जिल्ह्याचे मतदान चौथ्या टप्प्यात सोमवार दिनांक १३ मे रोजी होणार असून जिल्ह्यात २१ लाखापेक्षा अधिक मतदार आहेत या सर्व मतदारांना जिल्हाधिकारी यांनी आवाहन करून सांगितले, की मतदानाचा हक्क १३ मे ला रोजी बजावावा. निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडण्याचा लोकशाहीचा महोत्सव दर पाच वर्षांनी एकदाच येतो. यामध्ये आपले कर्तव्य प्रत्येक सुजाण मतदाराने निभावले पाहिजे. लक्षात असू द्या सोमवार दिनांक १३ मे बीडजिल्ह्यात चौथ्या टप्प्यात १३ मे ला निवडणुका होणार असून केवळ निवडणुकीचा हक्क बजावण्यासाठी शासनाने ही विशेष सुट्टी जाहीर केली आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाची संपूर्ण यंत्रणा बीडवासियांसाठी कार्यरत असून ही संपूर्ण यंत्रणा विशेष परिश्रम घेत आहे. बीडच्या मतदारांची यात मुख्य भूमिका आहे.

याकाळात सहली/ तीर्थाटन करताना सोमवार दिनांक १३ मे तारीख लक्षात असू द्या. आपल्या तर्जनीला शाई लावण्याची ही संधी गमावू नका. आपले नाव मतदान यादीत आहे का हे तपासावे नसल्यास ते १५ एप्रिलपर्यंत मतदान यादीत आणण्यासाठी ऑनलाइन अथवा ऑफलाइन प्रक्रिया पार पाडून घ्यावी . ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक आयोगाकडून तारखा जाहीर झालेल्या असून निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करण्याची तारीख ही १८ एप्रिल आहे तर नामनिर्देशन करण्याची तारीख २५ एप्रिल पर्यंत आहे. अर्जाची छाननी ची तारीख २६ एप्रिल आणि अर्ज मागे घेण्याची तारीख २९ एप्रिल आहे. मतमोजणी ४ जूनला होणार असून एकूण निवडणूक प्रक्रिया ही ६ जूनला संपणार आहे . तरी मतदानाचा दिवस हा महत्त्वाचा असून मतदान १३ मे ला करून लोकशाहीच्या महोत्सवात सहभागी होऊन मतदान करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.




# वय वर्ष ८२ मात्र उत्साह तरूणाला लाजवेल

### तरूणाकडून महंताच्या हस्ते सत्कार !

**वादळवार्ता/शिरूरकासार**

साठी बुध नाटी असा काहिसा वाकप्रचार सर्रास वापरला जातो मात्र काही या बाबतीत अपवाद ठरतात असाच काहिसा अनुभव शिरूर कासारमधील एका ८२ वर्षीय आजोबाकडे पाहिल्यावर आल्याशिवाय राहत नाही , सध्या त्यांचे वय ८२ वर्ष असले तरी त्यांचा जो उत्साह आणि उर्जा अगदी २८ विसातल्या तरूणांना सुध्दा लाजवेल असाच येतो .

शिरूर कासार येथील रहिवासी तथा शहरातील जेष्ठाच्या यादीत प्रथम क्रमांक लागतो ते माजी सरपंच तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते कांतिलालजी देसरडा मुळच्या व्यावसाईक स्वभावाची जडण घडण असलेले परंतू त्यांचा बदलता स्थाईस्वभाव एका गुणात सतत बदल घडवून आणनारा त्यांचा प्रवास . वडील धोंडीरामजी देसरडा त्यांचे छोटेसे व्यासाईक त्यांचे हे थोरले चिरंजीव ,परंपरागत व्यवसायातून कधी नकळत समाज कारणासाठी राजकारणाच्या उंबरठ्यावर नव्हे घरात शिरकाव केला आणि ग्रामपंचायतचे सरपंच पदाच्या खुर्चीवर जाऊन बसले ,अभ्यासु आणि संघटन कौशल्याच्या बळावर ते तत्कालीन नेत्या स्व .केशरबाई क्षीरसागर यांच्या व पुढे श्रीपतराव कदम ,गोपिनाथराव मुंडे ,जयसिंगराव गायकवाड अशा अनेकांच्या सहवासात आले ,प्रदिर्घ काळ सरपंच पदावर हक्क गाजवला ,आताचे शहर व पुर्वीचे शिरूर कासार एक साधारण गाव याचा सर्वांगाने अभ्यास ,गावात एकुन जवळपास २८ जाती असल्याचाही त्यांचा अभ्यास असलेले कांतीलालजी अर्थात गावचे कांतीभाऊ तथा भावसा धार्मिक कार्यात देखील अग्रभागी असतात बावीस वर्षापुर्वी बालाजी मंदिर स्थापनेत मोलाचा वाटा ,आजपावेतो भावसा हे बालाजी महोत्सवात एक महत्वपुर्ण भुमिका निभावतात वयपरत्वे त्यांनी आता तरूणांना प्रेरणा देत पुढाकार सोपवला आणि ते कार्य चालू ठेवले असले तरी स्वत: बाजूला न राहता लोकवर्गणी ते खर्चाचा हिशेब बिनचुक सांभाळतात एव्हडेच नव्हे तर सुत्रसंचलन देखील उभे राहून सांभाळतात . सात दिवसापासून सुरू असलेल्या २२ व्या महोत्सवात ते तशाच उत्साहाने सहभागी होते मंगळवारी समारोप प्रसंगी महंत स्वामी विवकानंद शास्त्री यांनी त्यांचे तोंडभरून कौतूक तर केलेच परंतू तरूण कार्यकर्त्याकडून सत्कार करून घेत त्यांची प्रेरणा व उर्जा तरूणांनी घ्यावी असे आवाहन केले. यावेळी बालाजी मंडळाचे अमोल बर्वे ,अमोल तावरे ,ज्ञानेश्वर गाडेकर ,प्रकाश देसरडा ,धनंजय झिंजुर्डे ,अतिष कपाळे गोवर्धन गायकवाड , नान्नजकर. ननवरे काटे आदी सर्वच तरूण कार्यकर्ते उपस्थित होते.



दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )